# जपानी पुष्परचना - भाग २४



नमस्कार रसिक वाचक हो!
तुम्हाला सर्वांना नवीन वर्षाच्या खूप खूप मनापासून शुभेच्छा!
नवीन वर्ष सुरु झाले की लगेच पहिला येणारा आपला सण म्हणजे संक्रांत. यावर्षी १५ जानेवारीला आहे संक्रांत. यावेळी या संक्रांतीची आठवण करून देणारी रचना केली आहे. ज्वारी बाजरीची कणसे, वाळलेले गवत, काळी सुगडी आणि त्यातील पांढरी फुले, उतू जाणारे दूध किंवा पांढरा शुभ्र हलव्याची आठवण करून देत आहेत. गवताचे पांढरे गुलाबी तुरे पण या वेळी येतात ते वापरले आहेत. या सर्वांबरोबर उठून दिसणारे लाल गुलाब व सुपारीची फुले लावली आहेत. एकूण सर्व एकत्रितपणे संक्रांतीची आठवण जागी करत आहेत.

**सौ. अरुंधती देशपांडे**
व्हाईस प्रेसिडेंट इकेनोबो पुणे शाखा
asdssd@gmail.com
9881045456